|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबाचौउमवि/14/विवि/ 35/ 343/2019 दि.28/11/2019

प्रति,

1) मा. प्राचार्य/ संचालक, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था

2) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना -

विषय :- आंतर महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा (हिंदी किंवा इंग्रजी) करीता प्राथमिक फेरीबाबत..

महोदय / महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत पदवी-पदव्युत्तर नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी सातत्याने विविध स्पर्धा, उपक्रम, परिसंवाद, चर्चा सत्र, कौशल्य कार्यशाळा आदी व्दारे अंगीकृत कलागुणांना प्रोत्साहन देण्याकरीता आयोजन करण्यात येत असते या उपक्रमातील यशस्वी स्पर्धकास आंतर विद्यापीठ /राज्यस्तरावरील उपक्रम/ स्पर्धा/महोत्सव आदीत सहभागी होण्याची संधी असते.

46 वी कमलनयन बजाज स्मृती राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ वक्तृत्व (हिंदी किंवा इंग्रजी) स्पर्धेचे आयोजन शिक्षा मंडळ, जमनालाल बजाज रोड, वर्धा- 442 001 येथे ***बुधवार, दि. 22.01.2020 व गुरुवार, दि. 23.01. 2020*** रोजी होत असून या स्पर्धेमध्ये विद्यापीठाचा सर्वोत्तम गुणवत्ताधारक प्रतिनिधी सहभागी होण्याकरीता पात्रता फेरीचे आयोजन विद्यार्थी विकास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, जि. धुळे यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात येत आहे. आंतर महाविद्यालय वक्तृत्व (हिंदी/इंग्रजी) स्पर्धा आयोजनाचा सविस्तर तपशिल येणेप्रमाणे -

* **मंगळवार, दि. 24 डिसेंबर, 2019** रोजी **सकाळी 11.00 वाजता**
* **स्थळ :-** क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, जि. धुळे
* **स्पर्धेचा विषय :-** स्पर्धा सुरु होण्यापुर्वी भाषानिहाय (हिंदी किंवा इंग्रजी) पाच विषय अर्धातास आधी देण्यात येईल. त्यापैकी एक विषय स्पर्धकास मिळेल.
* **नियम व अटी :-**

1. स्पर्धेचे माध्यम हिंदी/ इंग्रजी राहील.
2. सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाने भाषानिहाय किमान 02 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाठवावे.
3. स्पर्धा सहभाग **निशुल्क** राहील.
4. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी महाविद्यालयातील नियमीत प्रवेशित असावा व त्याच्या / तिच्याकडे महाविद्यालयाचे ओळखपत्र असावे. तात्पुरता प्रवेश (Provisional Admission) घेतलेल्या विद्यार्थी स्पर्धकास पाठवू नये.
5. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना माहितीबाबत काही आक्षेप प्राप्त झाल्यास आवश्यक पडताळणीनंतर तो आक्षेप सिध्द झाल्यास अशा विद्यार्थ्यांची शिफारस करण्याऱ्या महाविद्यालय / मान्यता प्राप्त संस्था / विद्यापीठ प्रशाळा-विभाग यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.
6. स्पर्धक महाविद्यालय / मान्यता प्राप्त संस्था / विद्यापीठ प्रशाळा-विभाग येथील नियमीत विद्यार्थी असून स्पर्धेच्या वेळी त्यांचे वय 25 वर्षापेक्षा जास्त नसावे.
7. स्पर्धकाने ठिक सकाळी 10.00 वाजता स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहाणे आवश्यक आहे.
8. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकास सादरीकरणासाठी 10 मिनीटांचा (8 मिनीटे + 2 मिनीटे) वेळ दिला जाईल, त्या वेळेतच सादरीकरण संपविणे आवश्यक आहे. चार मिनीटांनंतर पुर्वसूचनेची घंटा वाजविण्यात येईल.

9. स्पर्धक विद्यार्थ्यांचा प्रवास, भोजन इ. खर्च संबधित महाविद्यालय / मान्यता प्राप्त संस्था / शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांनी करणे अपेक्षित आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकाची माहिती व जन्म दाखल्याची साक्षांकित प्रत **सोमवार, 23 डिसेंबर, 2019** पर्यंत क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, जि. धुळे यांच्याकडे ई-मेल knb_artscollege@rediffmail.com वर पाठवावी.
10. ऐनवेळी प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

* **पारितोषिके दोन्ही भाषा (हिंदी/ इंग्रजी) माध्यमांकरीता एकत्रित :-**

1. प्रथम क्रमांक - रु.1000/- व प्रमाणपत्र
2. द्वितीय क्रमांक - रु. 700/- व प्रमाणपत्र
3. तृतीय क्रमांक - रु. 500/- व प्रमाणपत्र

स्पर्धेत प्रत्यक्ष सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

* **स्पर्धेच्या माहितीसाठी संपर्क व्यक्ति व क्रमांक** :-

| नाव | दूरध्वनी क्र. | भ्रमणध्वनी क्र. | ई-मेल |
|---|---|---|---|
| प्राचार्य, डॉ. डी.एच.उमाळे | 02562-260527 | 9421530778 | vijay hubhale@gmail.com |
| डॉ.एस.जे.पाटील,वि.वि.अधिकारी | 02562-260527 | 9689431762 | sjpatil.07@rediffmail.com |
| डॉ.के. डी. बागुल, वि.प्र. हिंदी | 02562-260527 | 7588829518 | kdbagulnn@rediffmail.com |
| प्रा. यु.वाय.गांगुर्डे, इंग्रजी विभाग समन्वयक | 02562-260527 | 9421531649 | uygangurde2@gmail.com |

आपणांस विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपल्या विद्यार्थ्यांना अंगीकृत कलागुण सादर करण्यासाठी सदर वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आपण व आपल्या सहकार्याद्वारे त्यांना प्रेरित करावे.

आंतर महाविद्यालय वक्तृत्व (हिंदी किंवा इंग्रजी) स्पर्धेत निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे पुरविलेल्या नमुन्यातील अर्ज **सोमवार, 23 डिसेंबर, 2019** पर्यंत मा. प्राचार्य, क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, यांना ईमेल knb_artscollege@rediffmail.com वर पाठवून सहकार्य करावे व विद्यार्थ्यांना परिपत्रकातील सुचनेप्रमाणे वेळेवर उपस्थित राहाण्याच्या सूचना द्याव्यात. सदर परिपत्रक व विद्यार्थी प्रवेशिका विद्यापीठ **www.nmu.ac.in** या संकेत स्थळावर व KBCNMU App वर Circular Link मध्ये भेट दिल्यास Students Development & NSS वर उपलब्ध होईल.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. सत्यजित साळवे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

* **सोबत :-** प्रवेशिका

* **प्रतः-**

1. मा. प्राचार्य, क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, जि. धुळे
2. सर्व जिल्हा/ क्षेत्र विद्यार्थी विकास समन्वयक
3. मा. प्र.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
4. विभागप्रमुख, कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
5. विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
6. मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
7. मा.पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

नमुना

# स्पर्धक प्रवेशिका

दि.    /    /२०१९

प्रति,
**मा. प्राचार्य,**
क्रांतीवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, जि. धुळे

**विषय:- आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ वक्तृत्व स्पर्धेत (हिंदी किंवा इंग्रजी)** सहभागाबाबत.....
**संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्र. कबाचौउमवि/१४/विवि/३५/        /२०१९, दि. १४/१०/२०१९**

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय परिपत्रकान्वये आपल्याकडे मंगळवार, दि.२४ डिसेंबर, २०१९ रोजी आयोजित **आंतर महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धे (हिंदी किंवा इंग्रजी)** करीता आमच्या महाविद्यालय / परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा-विभाग मधील खालील विद्यार्थीनी सहभागी होत आहेत.

| अ. क्र. | नांव, संपर्क क्रमांक व ई-मेल | वर्ग | माध्यम - हिंदी/ इंग्रजी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

तरी **आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे (हिंदी किंवा इंग्रजी)** नियम व अटी आम्हाला मान्य असून उपरोक्त नमूद विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेत सहभागी करुन घ्यावे, ही विनंती.

ठिकाण:-
दिनांक:-    / ०९/२०१९

**विद्यार्थी विकास अधिकारी**
नाव व सही

**प्राचार्य/ संचालक**
सही व शिक्का